केंद्र पुरस्कृत निर्मल ग्राम पुरस्कार योजना
२०१०-११ अंतर्गत पंचायतराज संस्थांना
दुसऱ्या हप्त्याची पुरस्काराची रक्कम
वितरीत करण्याबाबत...

महाराष्ट्र शासन

पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग

शासन परिपत्रक क्रमांकः निर्मल-१३१५/प्र.क्र.२१/पापु-१६
७ वा मजला, जी.टी. रूग्णालय संकुल,
लोकमान्य टिळक रोड, मंत्रालय, मुंबई- ४०० ००१.
तारीख: २७ जानेवारी, २०१६

वाचा

१. **केंद्र शासनाचे मंजूरी आदेश: दि.२८ फेब्रुवारी, २०१२.**
२. **केंद्र शासनाचे मंजूरी आदेश: दि.२३ फेब्रुवारी, २०१५.**
३. **पाणी पुरवठा व स्वच्छता विभागाचे शासन परिपत्रक क्रमांक: निर्मल-१०१२/प्र.क्र.७६/ पापु-१६, दि.१७ एप्रिल, २०१२.**
४. **पाणी पुरवठा व स्वच्छता विभागाचा शासन निर्णय क्रमांक: निर्मल-१३१५/प्र.क्र.२१/ पापु-१६, दि.५ जानेवारी, २०१६.**
५. **केंद्र शासनाच्या निर्मल ग्राम पुरस्कार योजने संदर्भातील मार्गदर्शक सूचना**

प्रस्तावना

उघड्यावरील शौचविधीची पद्धत बंद होऊन ग्रामीण परिसर स्वच्छ व सुंदर व्हावा, यासाठी केंद्र शासनाने सन २००३ पासून निर्मल ग्राम पुरस्कार योजना जाहीर केलेली आहे. निर्मल ग्राम पुरस्कार योजना २०१०-११ अंतर्गत महाराष्ट्रातील ४४२ ग्रामपंचायतींना व २ पंचायत समितींना केंद्र शासनाने रोख पुरस्कार जाहीर केलेले आहेत. यामध्ये केंद्र शासनाचा हिस्सा १०० % आहे. केंद्र पुरस्कृत निर्मल ग्राम पुरस्कार योजना २०१०-११ अंतर्गत पंचायतराज संस्थांना जाहीर झालेल्या पुरस्काराच्या दुसऱ्या हप्त्याची पुरस्काराची रक्कम वितरीत करण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन होता.

शासन परिपत्रक:

केंद्र पुरस्कृत निर्मल ग्राम पुरस्कार योजना २०१०-११ अंतर्गत केंद्र शासनाकडून वाचा मधील क्र.१ येथील मंजूरी आदेशान्वये रू.४६२.०० लक्ष इतकी रक्कम अर्थसंकल्पबाह्य प्राप्त झालेली होती. सदर अर्थसंकल्पबाह्य रकमेपैकी रू.२८८.२५ लक्ष इतकी निर्मल ग्राम पुरस्काराची रक्कम (पहिला हप्ता) संबंधित मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद यांना वाचा मधील क्र.३ येथील शासन परिपत्रकान्वये वितरीत करण्यात आलेली आहे. केंद्र पुरस्कृत निर्मल ग्राम पुरस्कार योजना २०१०-११ अंतर्गत वाचा मधील क्र.२ येथील केंद्र शासनाच्या मंजूरी आदेशान्वये रू.११४.५०

लक्ष एवढी दुसऱ्या हप्ताची रक्कम प्राप्त झालेली होती. सदर निधी केंद्र पुरस्कृत निर्मल ग्राम पुरस्कार योजनेंतर्गत केंद्र हिश्श्यासाठी २२१५ ९८१७ या लेखाशीर्षाखाली सन २०१५-१६ मध्ये पुरवणी मागणीद्वारे अर्थसंकल्पीत करण्यात आलेला होता. केंद्र पुरस्कृत निर्मल ग्राम पुरस्कार योजना २०१०-११ अंतर्गत वित्त विभागाने अर्थसंल्पीय वितरण प्रणालीद्वारे उपलब्ध करून दिलेली दुसऱ्या हप्त्याची पुरस्काराची रक्कम रू.११४.५० लक्ष (एक कोटी, चौदा लक्ष, पन्नास हजार) संबंधित मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद यांना वाचा मधील क्र.४ येथील शासन निर्णयान्वये वितरीत करण्यात आलेली आहे.

२. केंद्र पुरस्कृत निर्मल ग्राम पुरस्कार योजने अंतर्गत केंद्र शासनाकडून अर्थसंकल्पबाह्य प्राप्त झालेली व सद्यस्थितीत संचालक, पाणी व स्वच्छता सहाय्य संस्था यांच्या अधिनस्त असलेल्या निधीमधून निर्मल ग्राम पुरस्कार योजना २०१०-११ अंतर्गत पंचायतराज संस्थांना दुसऱ्या हप्त्याची पुरस्काराची रक्कम रू.६३.५० लक्ष (रू.त्रेसष्ट लक्ष, पन्नास हजार फक्त) संबंधित मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद यांना सोबत जोडलेल्या विवरणपत्रातील स्तंभ क्र. ७ नुसार संचालक, पाणी व स्वच्छता सहाय्य संस्था, नवी मुंबई यांनी वितरीत करावी.

३. या शासन परिपत्रकान्वये मुक्त केलेली रक्कम पुढील अटींवर मंजूर करण्यात येत आहे.

अ) संचालक, पाणी व स्वच्छता सहाय्य संस्था यांनी या परिपत्रकासोबत जोडलेल्या विवरणपत्रानुसार रू.६३.५० लक्ष इतका निधी संबंधित जिल्हा परिषदांना सदर शासन परिपत्रक निर्गमित झाल्याच्या दिनांकापासून एका आठवड्याच्या आत वितरीत करून सदर निधी वितरण आदेशाची प्रत तात्काळ शासनास सादर करावी.

आ) या शासन परिपत्रकान्वये मंजूर केलेले अनुदान ज्या कारणासाठी मंजूर करण्यात आले आहे त्याच कारणासाठी खर्च करण्यात यावे. संबंधित जिल्हा परिषदांनी या शासन परिपत्रकाद्वारे मुक्त केलेला निधी, या कार्यक्रमासाठी उघडलेल्या राष्ट्रीयीकृत बँकेतील स्वतंत्र बँक खात्यात जमा करून संबंधित पुरस्कार प्राप्त ग्रामपंचायतींना वितरीत करावा व याबाबतचा अहवाल शासनास व पाणी व स्वच्छता सहाय्य संस्थेस सादर करावा.

इ) निर्मल ग्राम पुरस्कार प्राप्त संबंधित ग्रामपंचायतींनी निर्मल ग्राम पुरस्कारांतर्गत प्राप्त निधी या कार्यक्रमासाठी उघडलेल्या राष्ट्रीयीकृत बँकेतील स्वतंत्र बँक खात्यात ठेवणे बंधनकारक असून सदर रक्कम केंद्र शासनाने ठरवून दिलेल्या मार्गदर्शक सूचनांमधील तरतूदींनुसार तसेच या संदर्भात राज्य शासनाने वेळोवेळी निर्गमित केलेल्या सूचनेप्रमाणे/आदेशाप्रमाणे खर्च करण्यात यावी.

ई) संबंधित जिल्हा परिषदेने या शासन परिपत्रकाद्वारे मंजूर करण्यात आलेल्या अनुदानापेक्षा जास्त खर्च करू नये.

उ) सदर रक्कम खर्च झाल्यानंतर त्याचे उपयोगिता प्रमाणपत्र शासनास व पाणी व स्वच्छता सहाय्य संस्थेस त्वरीत सादर करावे. याबाबत कोणतीही दिरंगाई करण्यात येऊ नये.

सदर शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१६०१२७११४०५३८८२८ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Shwetambari Pravin Khade

Digitally signed by Shwetambari Pravin Khade
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Desk Officer, postalCode=400032, st=Maharashtra, cn=Shwetambari Pravin Khade
Date: 2016.01.27 12:43:10 +05'30'

(श्वे. प्र. खडे)
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. विभागीय आयुक्त, विभाग कार्यालय, सर्व.
२. उपायुक्त विकास, सर्व विभागीय आयुक्त यांचे कार्यालय.
३. जिल्हाधिकारी व सदस्य सचिव, जिल्हा नियोजन समिती सर्व.
४. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, सर्व यांनी सदर शासन परिपत्रक सर्व संबंधित ग्रामपंचायतींच्या निदर्शनास आणावे.
५. संचालक, पाणी व स्वच्छता सहाय्य संस्था, (WSSO), बेलापूर, नवी मुंबई.
६. उपमुख्य कार्यकारी अधिकारी (पा.व स्व.), जिल्हा परिषद, सर्व.
७. मुख्य लेखा व वित्त अधिकारी, जिल्हा परिषद, सर्व.
८. प्रधान सचिव, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, यांचे स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई.
९. कार्यासन क्र.पापु-०४, पापु-०८ व पापु-२०, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, मंत्रालय, मुंबई.
१०. निवड नस्ती, कार्यासन पापु-१६.

विवरणपत्र

केंद्र पुरस्कृत निर्मल ग्राम पुरस्कार योजना २०१०-११ अंतर्गत पंचायतराज संस्थांच्या दुसऱ्या हप्त्याच्या पुरस्कार रकमेचे वितरण

शासन परिपत्रक क्र.निर्मल-१३१५/प्र.क्र.२१/पापु-१६, दि. २७ जानेवारी, २०१६ सोबतचे सहपत्र.

(रू.लाखांत)

अ.क्र.	जिल्हा परिषदेचे नाव	पुरस्कार प्राप्त ग्रा.पं. संख्या	पुरस्काराची एकूण रक्कम	दि.१७ एप्रिल, २०१२ च्या शासन परिपत्रकान्वये मुक्त करण्यात आलेली पहिल्या हप्त्याची रक्कम (५० %)	दि.५ जानेवारी, २०१६ च्या शासन निर्णयान्वये विवरणपत्र-१ नुसार मुक्त करण्यात आलेली दुसऱ्या हप्त्याची रक्कम (लेखाशीर्ष २२१५ ९८१७) (५० %)	या शासन परिपत्रकान्वये मुक्त करण्यात येत असलेली दुसऱ्या हप्त्याची रक्कम (५०%)
१	२	३	४	५	६	७
१	ठाणे	४६	७४.५०	३७.२५	०.००	२७.७५
२	पालघर	१०			०.००	९.५०
३	रायगड	४	८.००	४.००	४.००	-
४	रत्नागिरी	५१	७४.००	३७.००	०.००	०.००
५	सिंधुदूर्ग	१४	२४.००	१२.००	१२.००	-
६	नाशिक	३	३.००	१.५०	०.००	१.५०
७	धुळे	-	-	-	-	-
८	नंदूरबार	४	३.५०	१.७५	१.७५	-
९	जळगाव	१६	२०.००	१०.००	१०.००	-
१०	अहमदनगर	१	०.५०	०.२५	०.२५	-
११	पुणे	३	२.००	१.००	१.००	-
१२	सातारा	४	४.००	२.००	२.००	-
१३	सांगली	२४	३१.००	१५.५०	१५.५०	-
१४	सोलापूर	७०	८१.००	४०.५०	४०.५०	-
१५	कोल्हापूर	१५	४१.५०	२०.७५	०.००	२०.७५
१६	औरंगाबाद	१	०.५०	०.२५	०.२५	-
१७	जालना	२८	२९.५०	१४.७५	०.००	०.००
१८	परभणी	१३	९.००	४.५०	०.००	०.००
१९	हिंगोली	२९	१८.५०	९.२५	०.००	०.००
२०	बीड	५	५.००	२.५०	०.००	०.००
२१	नांदेड	३	१.५०	०.७५	०.७५	-
२२	उस्मानाबाद	९	१६.५०	८.२५	०.००	०.००

अ.क्र.	जिल्हा परिषदेचे नाव	पुरस्कार प्राप्त ग्रा.पं. संख्या	पुरस्काराची एकूण रक्कम	दि.१७ एप्रिल, २०१२ च्या शासन परिपत्रकान्वये मुक्त करण्यात आलेली पहिल्या हप्त्याची रक्कम (५० %)	दि.५ जानेवारी, २०१६ च्या शासन निर्णयान्वये विवरणपत्र-१ नुसार मुक्त करण्यात आलेली दुसऱ्या हप्त्याची रक्कम (लेखाशीर्ष २२१५ ९८१७) (५० %)	या शासन परिपत्रकान्वये मुक्त करण्यात येत असलेली दुसऱ्या हप्त्याची रक्कम (५०%)
२३	लातूर	११	८.००	४.००	०.००	४.००
२४	बुलढाणा	३	२.५०	१.२५	१.२५	-
२५	अकोला	-	-	-	-	-
२६	वाशिम	-	-	-	-	-
२७	अमरावती	१	१.००	०.५०	०.००	०.००
२८	यवतमाळ	७	६.५०	३.२५	०.००	०.००
२९	वर्धा	३७	३८.५०	१९.२५	०.००	०.००
३०	नागपूर	१०	१०.५०	५.२५	५.२५	-
३१	भंडारा	७	७.००	३.५०	०.००	०.००
३२	गोंदिया	२	३.००	१.५०	०.००	०.००
३३	चंद्रपूर	११	१२.००	६.००	०.००	०.००
३४	गडचिरोली	-	-	-	-	-
	एकूण	४४२	५३६.५०	२६८.२५	९४.५०	६३.५०
	अक्षरी रूपये		पाच कोटी, छत्तीस लाख, पन्नास हजार फक्त	दोन कोटी, अडुसष्ट लाख, पंचवीस हजार फक्त	चौऱ्याण्णव लाख, पन्नास हजार फक्त	त्रेसष्ट लक्ष, पन्नास हजार फक्त

Shwetambari Pravin Khade

Digitally signed by Shwetambari Pravin Khade
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Desk Officer, postalCode=400032, st=Maharashtra, cn=Shwetambari Pravin Khade
Date: 2016.01.27 12:44:18 +05'30'

(श्वे. प्र. खडे)
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन